


RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com

पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-04 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thursday 01 May 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ०४ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ गुरुवार, दि. ०१ मे २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये

## राज्यात खंडणीखोरांना राजाश्रय - पृथ्वीराज चव्हाण

राजेंद्र यादव
सांगली प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------

महाराष्ट्रात खंडणीखोरांना राजाश्रय मिळत असल्याने राज्यात सहा जिल्हे वगळता अन्यत्र उद्योजक गुंतवणूक करण्यास पुढे येत नाहीत. याचा परिणाम बेरोजगारीवर होत आहे. राज्य सरकारने मुख्यमंत्री कार्यालयात खंडणीखोरा विरूध्द कक्ष स्थापन करून याला पायबंद घातला पाहिजे असे मत राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी बुधवारी व्यक्त केले. आज चव्हाण यांनी शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांच्या निवासस्थानी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक आणि रायगड वगळता अन्य जिल्ह्यात नवे उद्योग उभा राहात नाहीत. याला कारण खंडणीखोरी आहे. खंडणीखोरीला राजाश्रय मिळत असल्याने ही प्रवृत्ती फोफावली आहे. विकसित सहा जिल्ह्यातच राज्याचे ७५ टक्के उत्पन्न मिळते, मात्र, अन्य जिल्ह्यांचा विचार व्हायला हवा, यासाठी खंडणीखोरीला आळा बसला पाहिजे. केवळ रस्ते बांधकाम केले तर प्रगती झाली असे म्हणता येणार नाही. समृध्दी येणे महत्वाचे आहे. दरडोई उत्पन्नामध्ये राज्य आता



अकराव्या नंबरवर पोहचले आहे. राज्य सरकार अडचणीत असून सत्तेवर असलेल्या तीनही पक्षात अंतर्गत बेबनाव आहे. भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढला असून याचा फटका जनतेला बसत आहे. काश्मिरमध्ये झालेला अतिरेकी हा निंदनीयच आहे. याविरूध्द कारवाई करण्यास सर्वच विरोधी पक्षांनी सरकारला पाठिंबा दिला आहे,अतिरेकी प्रवृत्तीचा बिमोड करायलाच हवा, यासाठी आम्ही सर्व विरोधी पक्ष सरकारच्या भूमिकेचे समर्थन करत आहोत. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांनी एक तर्फी व्यापार युध्द सुरू केले आहे. याचे गंभीर परिणाम सर्वच देशावर होणार आहेत. अमेरिकेच्या दबावाखाली केंद्र शासनाने करार करत असताना केवळ वाणिज्य मंत्रालयाच्यामार्फत करार न करता कृषी व उद्योग विभागाचाही विचार करायला हवा. जागतिक व्यापार संघटनेचा भारत संस्थापक सदस्य आहे. मात्र ट्रम्प यांच्या भूमिकेमुळे या संघटनेचे अस्तित्वच धोक्यात आले असून अमेरिकेशी व्यापार करार करत असताना सरकारने विरोधकांनाही विश्वासात घेण्याची गरज आहे. जे करार होणार आहेत, त्याचा कृषी व लघू उद्योगावर विपरित परिणाम होण्याची भीती आहे. जात निहाय जनगणना करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असेल तर त्याचे स्वागतच करायला हवे. याची सुरूवात 2011 मध्ये मनमोहन सिंग सरकारने केली होती. त्याची आकडेवारीही उपलब्ध झाली होती. मात्र तांत्रिक कारणामुळे ती जाहीर करता आली नाही. यामुळे जातनिहाय जनगणना करण्यास काँग्रेसचा विरोध आहे असा आरोप चुकीचा असल्याचेही त्यांनी सांगितले. सांगली डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील हे जर शिवसेना शिंदे पक्षात येणार असतील तर त्यांच्यासाठी आमची दारे कायम खुली आहेत असे प्रतिपादन खा. श्रीकांत शिंदे यांनी मंगळवारी सायंकाळी मिरजेत बोलताना केले. खा. शिंदे म्हणाले, पैलवान पाटील हे चांगले कार्यकर्ते आहेत. यामुळे त्यांनी जर आमच्या पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला तर त्याचे स्वागतच आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सामान्य कार्यकर्त्याला वेळ देणारे नेते आहेत. कुणीही त्यांच्याशी संपर्क साधू शकतो. यामुळे अनेकजण शिवसेनेत येउ इच्छित आहेत. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी राज्यात अनेक योजना राबवल्या. त्यांच्या कार्यपध्दतीवर विश्वास ठेवून काही जण पक्ष प्रवेश करत असतील तर त्यांचे स्वागतच आहे. चंद्रहार पाटील हे ताकदीचे पैलवान असून त्यांना लागणारी अतिरियत ताकद शिवसेना निश्चितपणे पुरवेल असेही त्यांनी सांगितले.

## मोदी सरकारची जातीनिहाय जनगणनेची घोषणा, राहुल गांधींनी उपस्थित केले पाच महत्त्वाचे प्रश्न

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत
----------------------

केंद्र सरकारने देशात जातीनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली आहे. काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे. दरम्यान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते व काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी देखील या निर्णयाबद्दल सरकारचं कौतुक केलं आहे. मात्र, त्यांनी पाच महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. या जनगणनेची रचना कशी असेल? जनगणनेत केवळ आरक्षणाचाच विचार केला जाणार की त्यापुढची तयारी केली आहे? खासगी शिक्षण संस्थांमधील आरक्षणाचं काय? जनगणना कधी करणार? अंमलबजावणी कशी करणार? असे काही प्रश्न राहुल यांनी सरकारला विचारले आहेत. राहुल गांधी म्हणाले, " आम्ही सरकारच्या या निर्णयाचं पूर्ण समर्थन करतो. तसेच या जनगणनेची रचना कशी करायची यात काही योगदान हवं असल्यास आम्ही पूर्ण सहकार्य करू. कारण आम्ही



ही मागणी लावून धरली होती. आमच्या निवडणुकीआधीच्या जाहीरनाम्यातही आम्ही जनतेला याबद्दलचं आश्वासन दिलं होतं."

### राहुल गांधी नेमकं काय म्हणाले?

लोकसभेतील विरोधी पक्षनेते म्हणाले, "मला इथे काही मुद्दे उपस्थित करायचे आहेत. आपल्या देशात जातीनिहाय जनगणनेची दोन उदाहरणं आहेत. यापूर्वी बिहार व तेलंगणा या राज्यांनी अशी जनगणना केली आहे. मात्र दोन्ही राज्यांच्या जनगणनेत प्रचंड मोठा फरक आहे. आम्ही यावर बरंच संशोधन केलं असून केवळ जनगणना करण्यापर्यंतचा विचार केलेला नाही. आम्ही त्याही पुढचा विचार करून ठेवला आहे. समाजिक विकास हा त्यातील महत्त्वाचा मुद्दा आहे. जातीनिहाय जनगणनेच्या माध्यमातून आम्ही ही गोष्ट पुढे नेऊ इच्छितो."

### राहुल गांधींनी उपस्थित केला खासगी शिक्षण संस्थांमधील आरक्षणाचा मुद्दा

राहुल गांधी म्हणाले, "केवळ आरक्षण नव्हे तर देशात आदिवासी, ओबीसी, दलितांची किती भागिदारी आहे? देशातील संस्थांमध्ये या सर्वांची किती व कुठे भागिदारी आहे? त्यांना किती स्थान आहे? हे या जातीनिहाय जनगणनेतून समजलं पाहिजे. पॉवर स्ट्रक्चर आपल्याला समजलं पाहिजे. हे जनगणनेचं पुढचं पाऊल असेल. आपल्याला त्या दिशेने जावं लागेल. यासह खासगी शिक्षण संस्थांमधील आरक्षणाचा मुद्दा देखील आहेच. आपल्या कायद्यात तशी तरतूद आहे. मात्र तो कायदा लागू करावा, त्याची अंमलबजावणी करावी."

### अर्थसंकल्पात निधीची तरतूद करावी लागेल : राहुल गांधी

काँग्रेस खासदार म्हणाले, " सरकारने जातीनिहाय जनगणनेला उशीर केला असला तरी हे काम आता तातडीने व्हायला हवं. या उशिरा सुचलेल्या शहाणपणाचंही आम्ही स्वागत करतो. सरकारने आमचं स्वप्न निवडलं हे एक चांगलं काम केलं आहे. आता त्यांनी आम्हाला तारखा सांगाव्यात. जातीनिहाय जनगणना कधी सुरू करणार, कधीपर्यंत काम संपवून अहवाल सादर करणार? नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पात जनगणनेसाठी निधीची तरतूद केली नव्हती. मात्र आता तशी तरतूद करावी लागेल. आगामी अर्थसंकल्पात तशी तरतूद करणार का? या प्रश्नांची उत्तरं द्यावी."

## मृतात्म्यामुळे कुटुंबाला आजारपण; संशयावरुन शेजाऱ्यांशी वाद, अंनिसच्या प्रबोधनाने सलोखा

राजेंद्र यादव
सांगली प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------

मृतात्म्याच्या त्रासामुळे घरातील सदस्य सतत आजारी पडत आहेत. त्याची शांती करा असा आग्रह धरूनही शांती केली जात नाही. यामुळे शेजारी-शेजारी राहणार्या दोन कुटुंबात वादही झाला. आपसात अबोलाही धरला. हा वाद अंधश्रध्दा निर्मुलन समितीच्या कार्यकर्त्यांनी प्रबोधन व सामोपचाराने मिटवला. आता दोन्ही कुटुंबातील कटुता संपली आणि संवादही सुरू झाला. याबाबत अधिक माहिती अशी की, माडग्याळ (ता. जत) येथे एका कुटुंबातील वृद्ध व्यक्तीचे सहा वर्षांपूर्वी निधन झाले होते.तेव्हापासून शेजारी राहणार्या कुटुंबामध्ये मुले आणि महिला सतत आजारी पडत. त्यामुळे त्या कुटुंबाला वाटत होते की, शेजारील मयत वृद्ध




व्यक्तीचा आत्मा अशांत आहे.तो आमच्या घरी येऊन आमच्या कुटुंबीयांना त्रास देतो, आजारी पाडतो. यासाठी संबंधित कुटुंबाला त्यांनी वारंवार विनंती केली की,तुम्ही तुमच्या मृत वडिलांच्या आत्म्याची शांती करा, त्याला खानादाना द्या,म्हणजे तो शांत होईल. या गोष्टीला त्यांनी नकार दिला होता. या तगाद्याने दोन्ही कुटुंबात वादही झाला.मृताच्या घरातील सदस्य हे करणी, जादूटोणा करते असा अपप्रचार गावात केला गेला. त्यामुळे शेजारी राहणार्या या दोन्ही कुटुंबांनी एकमेकांशी अबोला धरला. तुम्ही मृतात्म्याची शांती का करत नाहीत' अशी विचारणा करून मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना गावांमध्ये सतत अपमानित केले जात होते. त्यामुळे त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा सचिव रवि सांगोलकर यांच्याशी संपर्क केला.काल सांगोलकर यांनी माडग्याळ गावी जाऊन त्यांनी दोन्ही कुटुंबांची एकत्र बैठक घेतली. या बैठकीस गावचे पोलीस पाटील सिद्धांना ऐवळे हेही उपस्थित होते. यावेळी श्री. सांगोलकर म्हणाले की, आत्मा पुनर्जन्म या गोष्टी विज्ञानाच्या कसोटीवर सिद्ध झालेल्या नाहीत. कोणताही मृत आत्मा येऊन आपल्याला त्रास देऊ शकत नाहीत. घरातील सततच्या आजारपणाला वेगळी कारणे असू शकतात. ती आपण शोधली पाहिजेत. आत्म्याची शांती करून आजारपण दूर होणार नाही. वेळीच वैद्यकीय सल्ला घेतला तर आजारपणावर नक्की मात करता येईल.अंधश्रद्धेतून असे खोटे आरोप करणे हा जादूटोणाविरोधी कायद्याअंतर्गत गुन्हा आहे. तुम्ही जर या कुटुंबाची पुन्हा बदनामी केली तर आम्ही कायदेशीर कारवाई करण्यास पोलिसांना सांगू. समोपचाराच्या बैठकीमध्ये दोन्हीही कुटुंबांचे समाधान झाले.त्या कुटुंबाने अंधश्रद्धेतून आरोप करणे आम्ही थांबवू अशी ग्वाही अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांना दिली. या बैठकीस अंनिस जाडरबोबलाद शाखेचे अध्यक्ष संतोष गेजगे, संतोष शिंदे उपस्थित होते.

## घड्याळी तासिका शिक्षकांच्या मानधनात अखेर वाढ! १२० रुपयांवरून २५० रुपयाच्या वाढीस अखेर मंजुरी

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------------

राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये घड्याळी तासिका तत्वावर कार्यरत शिक्षकांच्या मानधनामध्ये वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार माध्यमिक शाळांतील शिक्षकांना घड्याळी तासिकांनुसार २५० रुपये, तर कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षकांना ३०० रुपये मानधन देण्यात येणार आहे. उच्च माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालयातील घड्याळी तासिका तत्वावरील शिक्षकांना आतापर्यंत प्रति तास १५० रुपये मानधन मिळत होते, ते आता ३०० रुपये प्रति तास करण्यात आले आहे. तर माध्यमिकच्या शिक्षकांसाठी पूर्वीचे मानधन १२० रुपये होते, ते सुधारित करून २५० रुपये करण्यात

आले आहे. घड्याळी तासिका तत्वावर नियुक्त करण्यात येणारे शिक्षक पूर्णवेळ शिक्षकांप्रमाणे अर्हताप्राप्त असावेत. अर्हता पूर्ण नसलेल्या शिक्षकांची



घड्याळी तासिका तत्त्वावर नियुक्ती करण्यात येऊ नये. तसेच घड्याळी शिक्षकांची मानधन नियमितपणे अदा करण्यात येईल याची शिक्षण संचालक, ( माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे यांनी दक्षता घ्यावी, असे शिक्षण विभागामार्फत सांगण्यात आले आहे. दरम्यान, राज्यातील मान्यताप्राप्त प्राथमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातून एखाद्या विषयासाठी अर्धवेळ शिक्षकांसाठी आवश्यक असलेला कार्यभार उपलब्ध होऊ शकत नसेल तर अशा विषयाच्या अध्यापनासाठी अर्हता प्राप्त व्यक्तीची तासिका तत्वावर नियुक्ती करण्यात येते. त्यांना घड्याळी तासिकेनुसार मानधन देण्यात येते. यापुर्वी २०२२ मध्ये घड्याळी तासिका तत्वावरील शिक्षकांच्या मानधनात वाढ करण्यात आली होती. २०२२ पुर्वी माध्यमिकला ४२ रुपये आणि कनिष्ठ महाविद्यालयासाठी ७२ रुपये दर निश्चित केलेला होता. घड्याळी तासिका तत्त्वानुसार काम करण्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रतेचे शिक्षक मिळत नाहीत, अशी ओरड होती. २०२२ मध्ये सरकारने दरवाढ केली, तरी या अल्प मानधनावर शिक्षक काम करण्यास तयार होत नव्हते. कारण त्यांचे एकूण मानसिक मानधन आठ ते दहा हजार रुपयांच्या मर्यादेच होते. त्यामुळे त्यांचा ओढा खासगी शिकवणी वर्गांत शिकवण्याकडे असतो, असे शिक्षणतज्ज्ञांचे मत होते. राज्यातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर शिक्षकांची पदे रिक्त आहेत. शिक्षकांच्या रजा कालावधीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी शासनाच्या आदेशानुसार घड्याळी तासिका शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात येतात. माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता हा नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. या घड्याळी शिक्षकांना देखील मानधन वेळेवर मिळत नाही, अशा तक्रारी काही ठिकाणाहून प्राप्त होतात.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

सम्पादकीय

# पंतप्रधान काश्मीरऐवजी बिहारला का गेले?

पहलगाममधील हल्ला जेवढा नृशंस, तेवढाच अनेक प्रश्न उपस्थित करणारा ठरला. ज्यांनी काश्मीरचे वातावरण अनुभवले आहे आणि ज्यांच्यात सरकारच्या कारभाराविषयीही काही किमान पातळीवर जागरुकता आहे, अशा बहुतेकांच्या मनात अनेक प्रश्नांची साखळी तयार झाली असेल...सामान्यपणे कधीही काश्मीरला गेल्यावर पर्यटनस्थळी पावलापावलावर हमखास भारतील लष्कराचे सैनिक तैनात दिसतात. मग यावेळी असे काय झाले की, बैसारनमध्ये एकही सैनिक, पोलीस किंवा खासगी सुरक्षारक्षकही उपस्थित नव्हता? प्रत्येक ठिकाणी सैनिकांचा असणारा वेढा 'मिनी स्वित्झर्लंड'ला का नव्हता? काश्मीर हा सर्वांत संवेदनशील प्रदेश आहे. असे असताना सुरक्षा व्यवस्थेत अशी हलगर्जीपणा का झाली? भारत-पाकिस्तानच्या सीमेपासून पहलगामपर्यंतचे अंतर पार करून आलेले दहशतवादी सैनिकांच्या एकाही तुकडीला दिसले नाहीत? हल्ला झाला, देशातील प्रत्येक नागरिक व्यथित झाला. देशातील अठ्ठावीस निष्पाप बांधवांशी व त्यांच्या कुटुंबियांशी भावनेच्या धाग्याने जोडला गेला. देशाचे पंतप्रधानही परदेश दौरा अर्ध्यावर सोडून परत आले, पण ते काश्मीरला न जाता बिहारला का गेले? प्रचार करणे एवढे महत्त्वाचे होते? देशाच्या बिकट परिस्थितीत सर्वपक्षीय बैठकीला काहीच अर्थ नसतो का? सर्वपक्षीय बैठक म्हणजे रिकामटेकड्या लोकांचा रिकामटेकडा उद्योग असतो का? राजनाथसिंह संरक्षणमंत्री पदावर असले, तरीही त्यांचे त्या पदावरील अस्तित्त्व फारसे जाणवतच नाही. सामान्य जनतेला नेहमी अमित शहाच बोलताना दिसतात. त्यामुळे असेल कदाचित! अलीकडे कोणी दहशतवादाविषयी काही वक्तव्य केले की ती व्यक्ती देशभक्त असल्याचे सिद्ध झाले असे मानले जाते. त्यात आणखी दहशतवादासाठी काँग्रेसला जबाबदार धरले, की झालेच, त्याला एखादे चांगले पद देऊन गौरविणे हे कर्तव्यच ठरते. आता सर्वच चॅनेलवाले बरळतील, 'सरकारने, सुरक्षेत चूक झाली असे सांगितले.' आता हे कुणी सांगितले तर किरण रिजिजू या महोदयांनी अर्थात ते खापरही टूर कंपन्यांच्या माथी फोडण्यात आले. आता या चॅनेलवाल्यांचा एवढ्या वर्षांचा अभ्यास असूनही साधे एवढे कळू नये की, हे किरण रिजिजू यांचे वैयक्तिक मत आहे. त्यात सरकारचा काय संबंध... ? पण चॅनेलवाल्यांना तसेही सध्या काही काम नाही. पहलगामची तिच तिच दृश्ये किती वेळा दाखवणार, म्हणून त्यांनी रिजिजू महाशयांना पकडले, त्यात त्यांचा काय दोष! बिहार प्रचारातून सवड मिळाली तर या विषयावर पंतप्रधान बोलतीलच, हे सांगायला कुणा ज्योतिषाची गरजच नाही. खरे आहे ना! मोदींनी एक चांगले केले, पाकिस्तानशी केलेला सिंधूनदी जल करार तोडला. आता पाण्याशिवाय तडफडून मरेल पाकिस्तान, नाही का? पण तरी आमच्यासारख्या नागरिकांना एक प्रश्न पडला की, सुसाट धावणाऱ्या या नद्यांचे पाणी अडवल्यावर हिमालयात भूस्खलन होणार नाही, भूकंप होणार नाहीत? तसे झाले, तर हजारो, लाखो लोकांना जीव गमवावा लागणार नाही? अर्थात असे काही अघटीत घडणार नसल्याचे प्रमाणपत्र पर्यावरण मंडळाने दिलेच असेल म्हणा आणि जगतिक बँकेनेही करार तोडल्याचे प्रशस्तीपत्रक दिलेच असेल. आता सिंधू, झेलम, चिनाब या तिन्ही नद्यांवर बांध घालणे तर सरकारच्या हातचा मळ आहे. निशिकांत दुबे तर एका रात्रीत बांध घालून पाणी अडवून दाखवतील, यावर आमचा पूर्ण विश्वास आहे. सरकारचे एका बाबतीत मात्र खूप कौतुक वाटते. एवढे सगळे होऊनही अदानी समुहाच्या कंपनीकडून पाकिस्तानला होणारा वीज पुरवठा खंडीत करण्याचा वेडेपणा सरकारने केला नाही. नाहीतर भारताला खूप मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागले असते. पाकिस्तानने शिमला करार तोडला तेही चांगलेच झाले, त्यामुळे चीनचाही मार्ग मोकळा होऊन जाईल नाही का? पाकिस्तानने हवाई क्षेत्रात प्रवेशास बंदी केली तेही आपल्यावर उपकारच झालेत म्हणा; कारण शत्रूच्या प्रदेशात जायचेच कशाला? तसे केल्यास आपल्या हिंदू धर्माला विनाकारण कलंक लागतो; शिवाय आपले नागरिक अधिक पैसे मोजून विमानप्रवास करतील तर देशातला काळा पैसा आपोआपच बाहेर येईल आणि ती प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख जमा करायची पंतप्रधानांच्या मागची ब्यादही एकदाची मिटून जाईल, नाही का? सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'धरम पुछा, जाति नहीं' हे नॅरेटिव्ह पसरवणाऱ्या टीमला भारतरत्न अवश्य द्या. कारण गेल्या १२ वर्षांच्या कठोर परिश्रमांतून पेरलेले हिंदू-मुस्लीम द्वेषाचे बीज चांगलेच तरारून आले आहे. त्याला थोडे खतपाणी घातले तर पाकिस्तानचा (ना)पाक हेतू चांगल्याप्रकारे सफल होऊन एका भारताचे रूपांतर चार भारतांत (तसेही पाकिस्तानने खलिस्तानसाठी केलेली खेळीही 'नहले पे दहला') होऊन आपण यशाचे शिखर चारपट गाठणार त्याकरिता 'फुलों, फलों और वोट बटोरों' एवढेच सांगावेसे वाटते. 'देश में दंगल, पाकिस्तान में मंगल' करण्यासाठी आपण आयतीच जमीन तयार करून देणार आणि म्हणणार मातीत गाडणार. ते मात्र बापदादांच्या शंभरेक पिढ्या मातीत खपूनही काही जमलं नाही पण हे सरकार मात्र एवढे नक्की करून दाखवेल. या सरकारने ३० ते ७० वर्षे वयोगटातील नागरिकांना अफूची गोळी देऊन केवळ मूर्च्छित केले नाही तर बेकारही केले. सोशल मीडियावर फेक न्यूज पसरवणाऱ्यांना कठोर शिक्षा करण्याचे काम कुणी करायचे हे ठरवण्यासाठी ग्रोकचे मत घ्यावे लागेल का? आणि एक कळकळीची विनंती, जे कोणी मुस्लीम नागरिकांनी पर्यटकांना वाचवण्याचा प्रयत्न केला आणि दोघांनी जीवही गमावला हे काँग्रेसने पसरवलेले नरेटिव्ह आहे. त्यामुळे त्या मुस्लीम नागरिकांचा सरकारने चुकूनही उल्लेख करू नये. अन्यथा हिंदुत्व उगीचच धोक्यात यायचे नि मग जनता राष्ट्रद्रोहाचा ठपका ठेवायची. तरीही मूळ मुद्दा तसाच राहिला. या कारवायांचे खापर कुणावर फोडावे आणि त्यातून जनतेला मूर्ख कसे बनवावे याचे नियोजन कसे करावे, या प्रश्नाने पुन्हा विचारांचा धुरळा उडत आहे. पंतप्रधान प्रवास करून खूप थकले असतील, त्यामुळे या प्रश्नांची उत्तरे नंतर कधीतरी देता येतील. तशीही काही घाई नाही. बड़े बड़े देशों (शहरों) में, ऐसी छोटी छोटी बातें होती है। दिल पे मत लेना। २८ भारतीय बांधवांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून, कुटुंबातील सदस्यांना या दुःखातून लवकरात लवकर सावरण्याची ताकद परमेश्वराने आणि अल्लाने द्यावी! हीच प्रार्थना!

# समता महानायक वीरशैव लिंगायत धर्म प्रसारक व प्रचारक महात्मा बसवेश्वर

गोविंद ढगे
लोहा प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदुत

------------------------

**क्रांतीसुर्य जगज्योती महात्मा बसवेश्वर जन्म :-**

महात्मा बसवेश्वर यांचा जन्म बागेवाडी जिल्हा विजापूर कर्नाटक येथे इसवी सन ११३१ मध्ये वैशाख शुद्ध अक्षय तृतीया दिवशी मादीराज व मादलांबिका या वीरशैव दाम्पत्याच्या पोटी जन्म झाला त्यांचे वडील मादीराज व माता-मादालंबिका हे दोघेही मोठे शिवउपासक होते त्या काळाच्या विषमतावादी सामाजिक परिस्थितीमुळे त्यांचे मन अस्वस्थ व्हायचे म्हणून केवळ सामाजिक सुधारणा नव्हे तर समग्र बहुजन समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी महात्मा बसवेश्वर आणि संकल्प केला समता बंधुता एकता संस्कार सदाचार आणि समृद्धी या मार्गाने दम्बाचार अनाचार अविचार अविवेक यांचा संपूर्ण बिमोड करण्याचे महान कार्य महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात केले



" सत्य बोलावे हाच देवलोक आहे असत्या हाच मृत्यूलोक "

शुद्ध आचरण हे स्वर्ग व अनाचरण हेच नरक हे विवेकनिष्ठ तत्त्वज्ञान प्रबळ इच्छाशक्ती बुद्धी च्या व तत्वज्ञानाच्या बळावर १२ व्या शतकात जनक सामान्य पर्यंत पोहोचण्याचे महान कार्य महात्मा बसेश्वरांनी केले वीरशैव लिंगायत समाजातील ३५० च्या वर जाती उपजातींच्या लोकांना ईष्ट लिंग दिक्षा देऊन एका शेताखाली आणून त्यांना एक व ऐकोदेव उपासना करण्यास सांगितले त्यांनी आपल्या कृतिशील व विज्ञानवादी उपदेशाने समाज जीवनाच्या युक्ती कृती आणि मती यामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणला व समाजाला आत्मभान व आत्मशोध याची जाणीव करून दिली म्हणूनच महात्मा बसवेश्वर आधुनिक व मध्ययुगीन भारताचे जनक ठरतात एवढेच नव्हे तर विश्वातील एक लोकोत्तर युगपुरुष

"युगप्रवर्तक बहुजन नायक "

म्हणून त्यांची एक वेगळी ओळख निर्माण होते महात्मा बसवेश्वर आठ वर्षाचे असतानाच त्यांनी स्त्री-पुरुषांमध्ये भेदभाव करणाऱ्या उपनयन संस्था ला विरोध केला होता व या अनिष्ट प्रथेचा त्यांनी विरोध केला एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर पुढील काळात तात्कालीन स्थितीचा डोळसपणे अभ्यास करून समाजाला समर्थ विचार देण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतले वडलाचे बालपणी आकस्मात निधन झाल्यामुळे महात्मा बसवेश्वर महाराष्ट्रातील मंगळवेढा राज्याचे तात्कालीन मंत्री बलदेव हे त्यांचे मामा असल्यामुळे ते मामाकडे राहायला आले पुढे याच मामाची कन्या गंगा अंबिका यांच्याशी त्यांचा विवाह झाला आणि मंगळवेढ्याचे कोषागार मंत्री म्हणून महात्मा बसवेश्वरांची निवड करण्यात आली त्यांनी जगातील पहिली लोकशाही संसद ही बाराव्या शतकात शिवानुभव मंडप या नावाने स्थापन केली यात सर्वांना आपले मत मांडण्याचा अधिकार होता मग त्यात कोणीही असो यात ७७० शरण शरणी स्त्री पुरुष होते या लोकसभेत अनेक विषयावर चर्चा होत असे आणि न्याय देखील होत असे.. काही काळानंतर मंगळवेढ्याचे दुसरे मंत्री सिद्धराज यांच्या कन्या निलांबिकाशी महात्मा बसवेश्वरांचा दुसरा विवाह झाला हा विवाह आंतरजातीय विवाह होता नंतरच्या काळात मंगळवेढा याची राजवट कल्याण येथे गेली आणि राजा बिज्जल याचा सार्वभौम राजा झाला व महात्मा बसवेश्वरांना त्यांनी या राज्याचा महामंत्री पंतप्रधान म्हणून नियुक्त करण्यात आले महात्मा बसवेश्वरांनी पुरोगामी आणि आधुनिकतेचा इतिहास घडविला आणि लोकशाहीचा पहिला सिद्धांत या विश्वाला दिला अशा महान वीरशैव धर्म उद्धारक महात्मा बसवेश्वरांना त्यांच्या जयंतीनिमित्त शतशः नमन.....

**साईनाथ बावनपल्ले**
**रा.पिंपळगाव ढगे**
**ता. लोहा जिल्हा. नांदेड**

# लेंडी प्रकल्प धरण परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

----------------------

लेंडी प्रधान प्रकल्प मुखेड तालुक्यातील मौ. गोणेगाव अंतर्गत लेंडी प्रकल्प धरण परीसर व धरण लगत असलेली मौ. गोणेगाव, रावणगाव, मारजवाडी, हसनाळ, भाटापुर व इटग्याळ (प.दे) या गावांच्या हद्दीत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी प्रतिबंधात्मक आदेश निर्गमीत केले आहेत. या गावांच्या हद्दीत लेंडी प्रधान प्रकल्पाची होत असलेली कामे, ये-जा करणारी यंत्रणा, साहित्य व अधिकारी-कर्मचारी यांना विरोध करणारी सर्व गतीविधीस, मोर्चे, धरणे, उपोषणे, आत्मदहन व त्याअनुषंगाने इतर जमाव करणे यांना २९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ७ वाजेपासून ते २६ जून २०२५ रोजीचे २४ वाजेपर्यंत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंध करण्यात आले आहे. संबंधीतास नोटीस बजावून त्यांचे म्हणने ऐकुण घेण्यास पुरेसा अवधी नसल्याने, आणिबाणीचे प्रसंगी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) अन्वये एकतर्फी आदेश जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी २८ एप्रिल २०२५ रोजी निर्गमीत केले आहेत.

# कै. नारायणराव चिद्रावार स्मृती शस्त्रक्रिया शिबीर हीच खरी समाजसेवा आ. जीतेश अंतापुरकर

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------



अलीकडच्या काळात समाजात असंख्य गरीब, निराधार व वृद्ध रुग्ण अनेक गंभीर आजाराने त्रस्त असतात. अशा रुग्णावर मोफ़त शस्त्र क्रिया करने हीच खरी समाज सेवा आहे. देगलूर येथे गेल्या १५ वर्षापासून कै. नारायणराव चिद्रावार स्मृती प्रीत्यर्थ पूर्णत: मोफ़त शस्त्रक्रिया शिबीर आयोजित केले जाते हीच खरी समाजसेवा आहे. आज सर्व वयोगटातील नागरिकांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक असुन गरीब रुग्णांची सेवा केली निस्वार्थरित्या झाली पाहिजे असे प्रतिपादन जीतैश अंतापुरकर यॉंनी केले आहे. ते देगलूर येथे कै.नारायणराव चिद्रावार व्याख्यानमाला समिती व उपजिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटनप्रसंगी बोलत होते. या शिबिरात एकुण १०४ रुग्णावर मोफ़त शस्त्रक्रिया करण्यात आली. शिबीर उद्घाटण कार्यक्रमात व्यासपीठावर उपजिल्हा रुग्णालय देगलूरचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.नरेश देवनीकर , राष्ट्रवादी कांग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मीकांत पदमवार , नंदकिशोर दाशटवार माजी नगराध्यक्ष देगलूर नगर परिषद , वाय जी सोनकांबळे , शिवसेना तालुकाप्रमुख महेश पाटील एड. मोहसीन अली , भावना दाशटवार , डॉ. शेख मुजीब , डॉ.उत्तम इंगोले ,डॉ. अविनाश नामावार , डॉ. रवींद्र चिद्रावार , व डॉ.लाडके उपस्थित होते. आपल्या वडीलांच्या स्मृती प्रीत्यर्थ समाजातील उपेक्षित व वंचित जीवन जगणाऱ्या गरीब रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया करून वडीलाना वंदन केले पाहिजे, अशी कल्पना डॉ.रवींद्र चिद्रावार यांना सुचली व मागील १५ वर्षापासून भव्य मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले जात आहे.आजपर्यंत दोन हज़ारपेक्षा अधिक रुग्णावर यशस्वीपणे शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. त्यात अपेन्डेक्स, हार्निया , हायड्रोसील , मुळव्याध, मुतखडा, भगंदर, शिष्ठ , कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया इत्यादी आजारावर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. दि. २७ व २८ या दोन दिवसात १०४ रुग्णांवर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी कै.नारायणराव चिद्रावार यांच्या प्रतिमेचे पूजन व दिप प्रज्वलन मान्यवरांचा हस्ते करण्यात आले. आपल्या प्रास्ताविकपर भाषणातून श्री किरण चिद्रावर यांनी शिबीर आयोजनामागील भूमिका स्पष्ट करताना असे म्हणाले की, येणाऱ्या पिढीला कै.नारायणराव चिद्रावार यांच्या देगलूर शहराच्या विकास कामाची व दुरद्रृष्टीची ओळख व्हावी या उद्देशाने अनेक उपक्रम आयोजन समितीच्यावतीने राबविले जातात. कै.नारायणराव चिद्रावार याचां वारसा जपण्याचे कार्य करण्यासाठीच ३९ वर्षापासून व्याख्यानमाला व १५ वर्षापासून मोफत शस्त्रक्रिया शिबिराच्या आयोजन करीत असल्याची माहिती दिली. यावेळी श्री लक्ष्मीकांत पदम्वार यांनी मनोगत व्यक्त करताना असे म्हणाले की कै. नारायणराव चिद्रावार हे सर्व धर्म समभावाचे पुरस्कर्ते असलेले एक आदर्श लोकप्रतिनिधी होते. शिवसेनेचे श्री महेश पाटील भाषण करताना असे म्हनाले की, तू नारायणराव चिद्रावार स्मृतीप्रीत्यर्थ चिद्रावार कुटुंबाने केलेले कार्य हे देगलूरच्या इतिहासात विशेष नोंद घेण्यासाठी आहे, त्यांच्या सामाजिक कार्याचा इतरांनी आदर्श घेणे आवश्यक आहे. वाय जी सोनकांबले यानी देगलूर येथे मोफ़त व भव्य असे शस्त्रक्रिया शिबीर आयोजित केल्याबदल गोर ग़रीब जनतेच्या वतीने चिद्रावार कुटुंबाचे जाहीर आभार मानले कै. नारायणराव चिद्रावार यांच्या स्मृती प्रीत्यर्थ मोफत रुग्णसेवेचे हे पवित्र कार्य अखंडपणे चालू ठेवणे हीच कै.नारायणराव चिद्रावार यांना खरी श्रद्धाजंली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ संतोष येरावार तर आभार प्रा व्यंकट खंदखूरे यांनी मानले. दोनदिवसीय शिबीर यशस्वीतेससाठी डॉ.शेख मुजीब, डॉ.लाडके यांच्यासह नांदेड व देगलूर शहरातील तज्ञ डॉक्टर व उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले. याप्रसंगी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे सदस्य गुरुराज चिद्रावार , श्री अरुण चीद्रावार यांच्यासह बहुसंख्य रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक उपस्थित होते

# हाऊ फोटोकडे देखी, जरा हुघाडा भो डोया... ठेवा दूखणाले दूर, नको इंजेक्शन गोया...

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------

हा फोटो आपण ओळखला का? अर्थात आपल्या सर्वांच्या ओळखीचे आहेत. हे आहेत आपल्या साक्री रोडवरील 'सुयोग' परिवारातील देव डॉक्टर असलेल्या बापूसाहेब सैंदाणे व दादासाहेब दिलीप पाटील या गोड जोडी पैकी हृदयस्पर्शी, हृदयरोग तज्ञ डॉ. दादासाहेब दिलीप पाटील काल सकाळी मॉर्निंग वॉक करतांना मला दिसले आणि साक्री रोड वरील भाजीपाला विक्रेते तरुण मित्र प्रविणभाऊ सोनार यांना भ्रमणध्वनी करून त्यांचा फोटो टिपण्याची विनंती केली. आपल्याकडे येणाऱ्या रुग्णांना अगदी शुद्ध अहिराणी भाषेत 'नॉनस्टॉप' काय खावे? काय खाऊ नये? कुठला व्यायाम करावा असा गोड पण विनोदी



शैलीत मार्गदर्शन करणारे दादा अनेकदा मी अनुभवले -पाहिले आहे. एकूणच शहरातील सर्वच डॉक्टर्स असा सल्ला देतात पण स्वत: मॉर्निंग वॉकला जातात की नाही अशी साशकंता माझ्या मनात होती. आमच्या लहानपणी सहाव्या गल्लीतील कुंभार खुंट चर्नी रोड येथील डॉक्टर पद्मश्री स्व. दादासाहेब पांडूरंग राजाराम घोगरे यांना रोज फिरतांना आम्ही पहात होतो. पण डॉक्टरांबाबत असे दृश्य दुर्मिळच. अलीकडे युवा डॉक्टर्स रोज नियमित पोहण्याचा व्यायाम करतात हेही मला ज्ञात आहे. रुग्णांची काळजी वाहणाऱ्या डॉक्टरांनी स्वत:चीही काळजी घेतली पाहिजे असे सहज मनाला वाटते. अक्षरश: हजारो हृदय हाताळणाऱ्या हृदयरोग तज्ञ डॉक्टरांना स्वत:साठी खिशातील गोळी घेण्याचीही वेळ मिळू न देता स्वत:च्या हृदयाने दगा दिल्याची घटना या शहरात घडली आहे. म्हणूनच मला डॉ. दिलीप दादा पाटील रस्त्यावर मॉर्निंग वॉक करतांना दिसले बरे वाटले. ते नुसता सल्ला देत नाहीत तर 'आधी केले, मग सांगितले' उक्ती आणि कृतीची सांगड घालतांना दिसले. दिलीप दादांची मॉर्निंग वॉक अनेकांसाठी प्रेरणादायी ठरो.

## वाचकांच्या लेखणीतून

# आई....

माझ्या आनंदामध्ये तिने स्वतःचा आनंद शोधला
शब्दामध्ये सांगता न येणारा संघर्ष माझ्या आईने एकटीने लढला..
अडाणी आहे माझी आई
पावलो पावली अडते
पहाडापरी संकटांना एकटी बहादूर भिडते
एका एका घासासाठी
कासावीस करते भूक
दारिद्र्यात जन्मा आले
हीच वाटते चूक
आई सांगते बाळा
सोडायची नसते हिम्मत
अग्निमध्ये टिकून राहतो
त्याचीच वाढते किंमत....
गरिबीच्या हलाखीत देव सुध्दा आमच नशिब पहायचा
आईच्या पदराला बांधलेला तो एक रुपया
मात्र माझ्या फी ची जाणीव करून द्यायचा...
शाळेने कधी नोटिस काढली की सहल जाणार आहे
तेव्हा आपल्या आणि इतरांच्या गरिबीचा फरक समजायचा
म्हणून उठसूठ तिला बोलू नका रे



तुमच्या प्रत्येक मागण्या तिने पोसलेल्या असतात
तुम्हाला हे जग दाखवायला तिने
वेदनेच्या कळा सोसलेल्या असतात....
म्हणून ती आहे तोपर्यंत तिची सेवा करा
कारण ती असेल तर कुणालाच घाई नसते
विचारून बघा त्या पोरक्या लेकराला
ज्याच्या आयुष्यात आईच नसते...!
आयुष्याच्या पुस्तकातील परिस्थितीच पान जेव्हा रडवत तेव्हा आईची एक शिकवण
मात्र नेहमी पाठराखण करत
ती सांगते...
थकलीस तरी थांबू नको
रडून पराभव मानू नकोस
एक दिवस तुझ्या यशाच
संपूर्ण जग गाण गाईल
फक्त पोरी तू थांबू नकोस...!
अडाणी आईची ही शिकवण आयुष्याला चैत्रातल्या पालवीसारखी पुन्हा एकदा नव्याने बहर आणते...
आयुष्यभर कष्ट करून तिचे झिजलेले हात, अन पायाच्या त्या भेगा , माझ्या यशान आलेल तिच्या चेहऱ्यावरच ते गोड हसू
तर कधी गरिबीनं आणलेल तिच्या डोळ्यातील ते असंख्य आसू....
नेहमीच नव्याने जगण्याचे सामर्थ देतात..!

------------------------------

**प्रा.निलमताई इचके**
**(युवाव्याख्याता, निवेदिका,लेखिका)**



# सामोडे येथे भवानी मातेच्या उत्सवानिमित्ताने हरिकीर्तन

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------



सामोडे (ता. साक्री) येथील गावाची कुळदेवी आई भवानी मातेच्या उत्सवानिमित्ताने विविध कार्यक्रमाच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते.ह्यही वर्षी भवानी माता मित्र मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने भागवताचार्य ह भ प जानकी ताई सूर्यवंशी महाराज सुरतकर यांचं जाहीर कीर्तन आयोजित करण्यात आला आहे येथील गावाचे लागुन जामखेली नदीच्या तीरावर निसर्गरम्य वातावरणात असलेला भवानी मातेच्या मंदिर आहे. पुर्वीच्या काळात भवानी मातेचे मंदीर नव्हते तेव्हा गावात दर वर्षी जाळपोळ चालू असायची तेव्हा एकाच्या स्वप्नात दृष्टांत झाल्याने ग्रामस्थांनी अक्षतृतीयाच्या मुहूर्तावर भवानी मातेचे मंदीर बांधल्याने त्या वर्षापासून दरवर्षी होणारी जाळपोळ बंद झाल्याने दर वर्षे अक्षतृतीयाला देवीचा उत्सवानिमित्त यात्रेचे व कुस्तीचे नियोजन केले जाते ,पण गेल्या बारा वर्षापासून कुस्त्या बंद झाल्याने भवानी माता मित्र मंडळाच्या वतीने किर्तनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. येथे अक्षय तृतीयाला यात्रा भरते या दिवशी संपूर्ण गावाचा प्रत्येक घराचा पुरणपोळीचा नैवेद्य दाखवल्याशिवाय एकही जेवन करत नाही. अशी या देवीची ख्याती आहे. सालाबादप्रमाणे ह्याही वर्षी मंदिराला रंगरंगोटी करण्यात आली आहे. उत्सवानिमित्त बुधवार रोजी रात्री नऊ ते आकरा या वेळात भागवताचार्य जानकीताई सुर्यवंशी महाराज यांचा किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या यात्रेला पिंपळनेर पोलीसाचा चोक बंदोबस्त असतो.

सदर या कार्यक्रमाचा सर्व ग्रामस्थांनी लाभ घ्यावा असे आव्हान आयोजकांनी केले आहे.

# नूतन मराठा विद्यालय छडवेल कोरडे येथे निपुण महाराष्ट्र कृती आराखडा संपन्न

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------




दि.२३/४/२०२५ वार बुधवार रोजी नूतन मराठा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय छडवेल कोर्डे येथे मा.प्राचार्य रावसाहेब संजयकुमार पाटील व पर्यवेक्षक दादासाहेब रघुनाथ नागरे यांच्या मार्गदर्शनानुसार व निपुण महाराष्ट्र कृती आराखडा २०२५ अंतर्गत भाषा व संख्याज्ञान कौशल्य अंतर्गत इयत्ता ५ वी च्या विद्यार्थ्यांचा भाषा व गणित विषयाचा सराव पेपर घेण्यात आला. परीक्षेचे आयोजन विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक श्री. हरकलाल पवार श्री.सुनील जगताप श्री.शामनंदन सोनवणे, श्रीमती ज्योती सूर्यवंशी श्री. काशिनाथ गांगुर्डे, श्री.राकेश सूर्यवंशी यांनी केले. परीक्षेस विद्यालयातील इयत्ता ५ वी चे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# नंदुरबार येथे शोक सभेचे आयोजन

संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------



खोंडामळी गावचे ज्येष्ठ नागरिक व माजी सरपंच कै. भाईदास अमर पाटील यांच्या शोकसभेचे आयोजन नानासाहेब यशवंत देवराम पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी शाहीर हरिभाऊ पाटील मंगल कार्यालय ज्ञानदीप सोसायटी, धुळे रोड, नंदुरबार येथे करण्यात आले. शोक सभेसाठी माजी प्राचार्य बी एस पाटील (अध्यक्ष समाज प्रबोधक नंदुरबार जिल्हा ), साहित्यिक निंबाजी बागुल, दादासाहेब आर डी भामरे ,आबासाहेब व्ही एस भदाणे, मुख्याध्यापक प्रभाकर नांद्रे, तसेच समाज बांधव उपस्थित होते. कै. आबासाहेबांबद्दल सेवानिवृत्त शिक्षक एम टी ठाकरे , एस ए अहिरराव मामा मुख्याध्यापक आबासाहेब के एस पाटील, प्राचार्य डॉ. डी एस पाटील, इत्यादी मान्यवरांनी कृतज्ञता व्यक्त करताना आबासाहेबांसोबत घालवलेले क्षणांना उजाळा दिला. प्रा के डी पाटील सर यांनी कृतज्ञता व्यक्त करताना माझे आबा, आबांच्या कुटुंबाचा त्यांच्या प्रति असलेला जिव्हाळा त्यांनी एका प्रसंगातून नमूद केला तो म्हणजे आबासाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव प्रा राजेंद्र पाटील व के डी पाटील सोबत शिकत असताना प्रा के डी पाटील सरांना जेवणाच्या डब्याची सोय नव्हती हे जेव्हा आबासाहेबांच्या कुटुंबाला कळले तेव्हापासून राजेंद्र पाटील सोबत प्रा के डी पाटील यांना सुद्धा जेवणाचा डबा आबासाहेबांच्या घरून येत होता. आबासाहेब के एस पाटील यांनी कृतज्ञता व्यक्त करत असताना आबासाहेब त्यांच्या सरपंच असताना च्या कार्यकाळात केलेली विकास कामे आजही त्यांची साक्ष देत आहेत .माजी प्राचार्य बी एस पाटील यांनी कृतज्ञता व्यक्त करत असताना आबासाहेब म्हणजे एक संयमी, संवेदनशील व निगर्वी व्यक्तिमत्व होते. अध्यक्षीय भाषणात नानासाहेब यशवंत देवराम पाटील यांनी आबासाहेबांसोबत असलेली मैत्री व त्यांच्यासोबत केलेलं समाजकार्य याबद्दल ते बोलले. तसेच मित्र प्रेमापोटी डॉक्टरांनी बाहेर जाण्यास आणि बोलण्यास मनाई केली असताना सुद्धा शोकसभेत उपस्थित राहिलो हे त्यांनी प्रकर्षाने नमूद केले.

या शोकसभेचे संचालन शांताराम मोरे यांनी केले.

# आमदार सौ मंजुळा ताई गावित यांच्या प्रयत्नाने लाटीपाडा प्रकल्पातून सोडले आवर्तन

## काटवान परिसरातील गावांची पाणीटंचाई दूर होणार

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत








साक्री तालुक्यातील लाटीपाडा धरणातून सोमवारी सोहळा गावांसाठी आवर्तन सोडण्यात आले. त्यामुळे काटवान परिसरातील पाणीटंचाईची समस्या सुटण्यास मदत होईल. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख डॉक्टर तुळशीराम गावित यांच्या हस्ते आवर्तन सोडले. साक्री तालुक्यातील काटवान परिसरातील १६ ते १७ गावात काही दिवसापासून पाणीटंचाई निर्माण झाली होती. या भागातील अनेक विहिरींनी तळगाठला होता. त्यामुळे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य गोकुळसिंग परदेशी, मा. सरपंच विशाल देसले यांनी आमदार मंजुळा ताई गावित यांच्याकडे पाणी सोडण्याचे मागणी केली होती त्यानुसार आमदार मंजुळात गावित यांनी जिल्हाधिकाऱ्यांना आवर्तन सोडण्याची सूचना केली होती. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार सोमवारी आवर्तन सोडण्यात आले. यावेळी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता वटे, उप अभियंता के. एस. भंगार उपस्थित होते. तसेच उपसरपंच श्री अजय सोनवणे, दारखेल सरपंच श्री भामरे, कसाऱ्याचे श्री विशाल देसले, जितू नांद्रे व शिवसेनेचे कार्यकर्ते पदाधिकारी व पाटबंधारे विभागाचे कर्मचारी व काटवान परिसरातील शेतकरी बांधव उपस्थित होते.

# साक्री शहरात सरासपणे सट्टा मटकाचे दुकाने लावुन बाजार सुरु या अवैध धंद्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष का

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



साक्री शहरात सट्टा मटका बाजार मुळे गोर गरीब जनतेचे सरास पणे लुट चालू असून या अवैध्य धंद्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे या मटका बाजार लिहणाऱ्यांची दुकाने सकाळी सात वाजेपासून उघडून बसतात चहा नाश्ता पाण्याच्या दुकाना पेक्षा ही लवकर उघडतात मजुरी कामासाठी जाणारे कामगार वर्गावर या सट्टा बाजार चावला जातो हा खेळ सर्व पैशांचा दूगना पैसा बनविण्याचा आमिष मध्ये हे व्यसनाधीन खेळतात त्याचे दुगा न होता ते कर्जबाजारी या सट्टा मटका बाजारामुळे होताना दिसून येत आहे हे खोटारडे गेम साक्री शहरात चालण्यात येत आहे लिहिण्यासाठी त्यांचे स्वतःने बसवलेले माणसं सुद्धा कंटाळा करतात अश्या या साक्री शहरात अंदा धुंद पैशाची लूट मार या सटका मटका बाजारा मध्ये चालू आहेत स्वतःअंक जाहीर करतात आणि गरीब व्यसनाधीन व्यक्तीची पैसाची लुठमार होते हे मजुरी काम करून हे सट्टा मटका या खेळा मध्ये हारून जातात व घरी आपल्या परिवाराच्या खळगी भरण्याची चिंता पडते या खेळातच पैसे हारून जातात बरेच व्यसनाधीन या मटका बाजाराच्या आधीन झाले आहेत कायदा व सुव्यवस्थेच्या तीन तेरा नगरपंचायतीच्या परिसरात त्याचे माणसं बसवण्यात आले आहेत या मटका बाजार लिहणाऱ्या

माणसांची या दुकाना मुळे वाईट वळण लागतात व शाळेच्या परिसरा जवळ सुद्धा ही बसवलेले आहे याचा परिणाम शाळेच्या मुलांवरती वाईट परिणाम होऊ शकतो या धंदाचे परिणाम साक्री शहराच्या कान्या कोपऱ्या पर्यंत मटका बाजाराचा प्रभाव मोठा प्रमाणावर दिसून येत आहे या शहरात मटका बाजाराचे खोटया बाजार उपलब्ध करून जनतेची लूट करण्यात येत आहेत खेळणारा व्यसनाधीन पेक्षा जास्तीत जास्त आवतीने भाव उपलब्ध करून घेतले व व्येसनाधीन जनतेची सरास पणे लुट करण्यात येत आहे या पेश्याच्या काळा बाजारचा बंदोबस्त लावण्यात यावा.

# देगलूर, मुखेड तालुक्यांची तहान भागणार-लेंडी प्रकल्पाच्या घळभरणीला गती

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------



टंचाईग्रस्त देगलूर व मुखेड तालुक्यांसाठी आशेचा किरण ठरणारा लेंडी आंतरराज्यीय प्रकल्प आता अंतिम टप्प्यात पोहोचला असून लवकरच या भागातील पाण्याची भीषण टंचाई दूर होणार आहे. महाराष्ट्र आणि तेलंगणा यांचा संयुक्त प्रकल्प असलेल्या लेंडी धरणाची जलसाठा क्षमता ५.२३ टीएमसी असून, यामुळे जवळपास २६,९२४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत प्रकल्पाच्या घळभरणीबाबत सविस्तर चर्चा झाली. पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते. बैठकीत प्रकल्पग्रस्तांसाठी वाढीव कुटुंब पुनर्वसन अनुदान, शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान, तसेच सात गावांतील भूखंड वाटपाबाबत निर्णय घेण्यात आले. तसेच मुखेड तालुक्यातील बुडीत गावांचा प्रश्न लवकर मार्गी लावण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. घळभरणीचे काम पूर्ण झाल्यास धरणात १४५.१५ दलघमी इतका उपयुक्त पाणीसाठा तयार होणार असून, त्यामुळे देगलूर आणि मुखेड तालुक्यांना आवश्यक तेवढ्या पाण्याचा पुरवठा शक्य होईल. जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व नागरी सुविधा तत्काळ पूर्ण करून प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन तातडीने करण्याचे आदेश दिले. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे नांदेड जिल्ह्याच्या पाणी प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा निघणार असून, शेतकरी आणि नागरिकांसाठी हा एक दिलासा देणारा निर्णय ठरणार आहे.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# पहलगाम : भ्याड दहशतवादी हल्ला !

किसी मुल्क को बर्बाद करना हो तो लोगो को धर्म के नाम पर लढा दिजिए, मुल्क अपने आप बर्बाद हो जायेगा' - लियो टॉलस्टाय यांचे उद्गार आज खरे ठरत आहेत. २२ एप्रिल २०२५ रोजी अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष बेन्स हे भारतात होते, पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियात होते. भारताचे नंदनवन असलेल्या काश्मीरमध्ये देशाच्या विविध भागातून आलेले हजारो पर्यटक निसर्ग सौंदर्याचा मनसोक्त आनंद लुटत होते. काश्मीरच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला पर्यटन व्यवसाय बहरत असतांना दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये २८ हिंदू पर्यटकांना समोरून गोळ्या घातल्या. त्याची प्रतिक्रिया म्हणून देशात संतापाची लाट उसळणे नैसर्गिक होते. या वेळी समस्त विरोधी पक्षांनी सरकारला दिलेला एकमुखी पाठिंबा आणि विविध मुस्लीम संघटनांनी दिलेला संयमी आणि संवेदनशील प्रतिसाद हे सरकारसाठी जमेचे मुद्दे आहेत. पुलवामाप्रमाणेच या वेळीही सुरक्षा यंत्रणेबाबत काही गंभीर शंका आहेत.

पहलगाम हे पर्यटकांचे मोठे आकर्षण स्थळ आहे. सर्व देशातून काश्मीरमध्ये येणारे पर्यटक श्रीनगर, गुलमर्ग आणि पहलगाम येथे हमखास येतात, पहलगाम हे भारत-पाकिस्तान सरहद्दपासून बरेच दूर आहे. सरहद्दीपासून पहलगामला पोहोचायला ८ तास तरी लागतातच. अशा दूर अंतरावर पाकिस्तानमधून आलेले प्रशिक्षित व सशस्त्र दहशतवादी पोहोचले तरी कसे? हे गूढ अजून उकललेले नाही. किश्तबाडमधून त्रालच्या दाट जंगलातून हे पायपीट करुन आले असण्याची शक्यता आहे. पण ते पहलगामला पोहोचून तेथे २८ हिंदू पर्यटकांचे रक्ताचे सडे उडवेपर्यंत जम्मू-काश्मीर पोलीस, सीमा सुरक्षा दल, केंद्रीय राखीव सुरक्षा दल, निमलष्करी दले आणि लष्करी सैन्यदलाला सुद्धा त्याचा चांगपत्ता लागला नाही, याचे मोठे आश्चर्य वाटते. जम्मू काश्मीर हा देशातील सर्वांत मोठा संवेदनशील व हाय सिक्युरिटी झोन आहे. पाकिस्तानच्या सरहद्दीला लागून हे राज्य आहे. २४ तास डोळ्यांत तेल घालून तेथे घडणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवले जाते, मग यावेळी आपण कमी कुठे पडलो?

सुमारे दोन हजार पर्यटक असलेल्या ठिकाणी एकही सुरक्षा रक्षक नसणे, गुप्तचर यंत्रणेला सुगावा न लागणे याची जबाबदारी कोणाची? काश्मीरचे स्थित्झर्लंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बैसरन खोऱ्यात निरपराध व निष्पाप पर्यटकांच्या हत्याकांडाने रक्ताचा सडा पडला. त्या दिवशी बेसरनमध्ये येऊन कुणी घोडेस्वारीचा आनंद घेत होते तर कुणी खाण्यापिण्यात मस्त दंग होते, मुले खेळत होते, मस्ती करत होते, कुणी फोटो काढत होते, तर कोणी व्हीडिओ शूटिंगमध्ये निसर्गाचे सौंदर्य टिपत होते. अचानक गोळीबाराचे आवाज आले, पोलिसांच्या गणवेषात काही धावतांना दिसले, पोलिसांबरोबर कुणाची तरी चकमक चालू आहे असे पर्यटकांना क्षणभर वाटले पण ने तरुण दहशतवादी हातात बंदूक घेऊन प्रत्येकाला नाव विचारावला लागले, तू हिंदू का मुस्लीम असा प्रश्न थेट विचारू लागले, कलाम पढायला सांगू लागले आणि एकापाठोपाठ एक अशा हिंदू पर्यटकांना डोक्यावर, छातीवर गोळ्या घालून ठार मारू लागले. पत्नी आणि मुलांसमोर त्यांनी पुरुष पर्यटकांवर गोळ्यांचा वर्षाव केला. एवढा मोठा रक्तपात काश्मीर खोऱ्यात कित्येक वर्षांत घडला नव्हता.

त्या दिवशी पहलगाम परिसरात २५०० पर्यटक होते, बेसरनच्या पठारावर मराठी, हिंदी, कन्नड, तमिळ, गुजराती असे विविध भाषिक पर्यटक जमले होते. दहशतवाद्यांनी कुणालाही त्यांची जात, त्यांचा प्रांत किंवा त्यांची भाषा कोणती असा प्रश्न विचारला नाही, तर ते कोणत्या धर्माचे आहेत एवढाच प्रश्न विचारत होते, काहींनी पर्यटकांकडे आधारकार्ड व ड्रायव्हिंग लायसन्सची मागणी केली, ज्या पर्यटकांविषयी संशय आला त्यांच्या अंगावरची पेंट काढून खतना तपासला. खतना न केलेल्यांना त्यांनी जवळून गोळी घातली, जे गप्प बसले, तेही रक्ताच्या थारोळ्यात पडले. पहलगाममध्ये २५०० पर्यटक असतांना ज्या बेसरनमध्ये हत्याकांड घडले त्याच्या जवळपास कुठेही सुरक्षा व्यवस्था नव्हती, कुठेही पोलीस चौकी नव्हती, कुठेही गस्त नव्हती. दहशतवाद्यांना रोखायला कोणतीच सुरक्षा यंत्रणा नसावी हे असे कसे घडू शकते? विशेष म्हणजे गोळीबार झाल्यावर व २८ पर्यटकांची हत्या झाल्यावर दहशतवादी तिथेच काही काळ होते पण सुरक्षा व्यवस्थेला काही कळू शकले नाही, हे चिंताजनक आहे. दहशतवादी निश्चितच हत्याकांड घडविण्यापूर्वी अगोदर आलेले असणार, ते काही बंदुका हातात येऊन जंगलात फिरत बसणार नाहीत, मग ते कुठे राहिले, कुठे जेवले, त्यांना मदत करणारे स्थानिक कोण आहेत? घटनेनंतर पाच दिवस उलटले तरी त्याचा तपशील बाहेर आला नाही. पाकिस्तानच्या सीमेवरून दहशतवादी घुसले तेव्हा आपले सुरक्षा दल कुठे कुठे होते? दहशतवादी हे पोलिसांच्या किंवा लष्करी सैनिकांच्या गणवेषात पहलगामला आले होते, त्यांना सुरक्षा दलाचे गणवेष कुणी पुरवले? ते त्यांनी कुठे अंगावर घातले? अंगावरचे कपडे कुठे बदलले व कुठे लपवून ठेवले?

मोदी सरकारच्या दोन कारकिर्दीत पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याने सर्व देशाचा थरकाप उडला होता. दहशतवादी देशात कसे घुसले? तिथपर्यंत कसे पोहोचले, सुरक्षा दलाच्या जवानांना घेऊन जाणाऱ्या बसपर्यंत ते कसे पोहोचू



सुरक्षा दलाच्या सैनिकांची हत्या झाल्यावर इंटेलिजन्सचे अपयश म्हणून आरोप झाले, आता पहलगाम पर्यटकांच्या हत्याकांडानंतरही इंटेलिजन्सवर खापर फोडले जात आहे. पुलवामा हत्याकांडानंतर जम्मू-काश्मीरचे तत्कालीन उपराज्यपाल सतपाल मलिक यांनी त्या घटनेबाचत सरकारला दोष दिला होता. सरकारने दुर्लक्ष केले, असे म्हटले होते. पण त्या घटनेला कोण जबाबदार आहे हे कधी समजलेच नाही.

पहलगाम हत्याकांडाची जबाबदारी पाकिस्तान स्थित लष्कर-ए-तोयबाशी संलग्न असलेल्या द रेजिस्टेंस फ्रंट ने घेतली होती ती नंतर घुमजाव करून झटकली. दहशतवादी दक्षिण काश्मीरमधील कोकेरनाग येथून किश्तवाड मार्गे बेसरनला पोहोचले. बर्फाच्छादीत पर्वतांनी वेढलेल्या बेसरनच्या पठारावर दहशतवादी दुपारी ३ वाजता पोहोचले तेव्हा देशाच्या विविध भागांतून आलेले पर्यटक त्यांच्या मित्रमंडळी व परिवारासह मौज-मजा मस्तीत आनंद लुटत होते. आपल्याला कोणी प्रतिकार करणारे नाही, पर्यटक निःशस्त्र आहेत. जवळपास कुठेही सुरक्षा व्यवस्था नाही. हे दहशतवाद्यांना पूर्ण ठाऊक असावे. बेसरनपासून ५ किमी अंतरावर सीआरपीएफचा कॅम्प आहे, पण त्याची सुद्धा दहशतवाद्यांना पर्वा नव्हती.

मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २०० निरपराध मुंबईकरांचा बळी गेला. मुंबई पोलीस दलातील धाडसी व आक्रमक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनाही दहशतवाद्यांशी लढतांना मरण आले, पण मुंबई सर्व दहशतवादी पोलिसांनी आलेले सर्व दहशतवादी वेचून-वेचून ठार मारले. एवढेच नव्हे तर अजमल कसाबला पोलिसांनी जिवंत पकडला व पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा सर्व जगाला दाखवला, त्याच कसाबला नंतर फाशी झाली. संसदेवर दहशतवादी हल्ला झाला तेव्हाही सर्व दहशतवादी संसदेच्या प्रांगणातच ठार मारले गेले. मुंबईवरील आणि संसदेवरील हल्ल्यात दहशतवादी हे लष्करी गणवेषात होते. तसेच पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यातही दहशतवादी लष्करी गणवेषात होते. दुर्दैवाने पुलवामा येथील हल्ल्यात पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा म्हणून कोणाला पकडून जगाला दाखवता आलेला नाही. पहलगाम येथे हत्याकांड घडविणारे दहशतवादी कसे-कुठे पसार झाले ते अजून समजलेले नाही.

गेली सहा दशके जम्मू काश्मीरला घटनेतील ३७० कलमानुसार विशेष दर्जा होता. जम्मू-काश्मीरचा झेंडा सुध्दा वेगळा होता. केंद्राने केलेले कायदे काश्मीरच्या विधानसभेने मंजूर केल्यावर तिथे लागू होत असत. काश्मीरमध्ये हिंदुस्थानातील कोणात्याही व्यक्तीला मालमत्ता खरेदी करता येत नव्हते. मोदी सरकारने ३७० वे कलमच काढून घेतले, त्यावर संसदेने शिक्कामोर्तब ही केले. जम्मू-काश्मीरचे विभाजन करून लेह-लद्दाख वेगळा केला. काश्मीर हा केंद्रशासित प्रदेश केला. काश्मीरला विधानसभा दिली, पण पूर्ण दर्जा अजून मिळालेला नाही. मुख्यमंत्र्यापेक्षा जास्त अधिकार तेथील उपराज्यपाल यांना आहेत. पण अशा मुद्दयावरून काश्मीरमध्ये असंतोष व अशांतता कशी निर्माण होईल यासाठी पाकिस्तान सतत प्रयत्न करीत असतो. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख असीम मुनीर हे भारताच्या विरोधात नेहमीच गरळ ओकण्याचे काम करीत असतात.

१६ एप्रिल २०२५ रोजी इस्लामाबाद येथे एका परिषदेत ते म्हणाले, काश्मीर ही पाकिस्तानच्या गळ्यातील नस आहे, ती कधीही विसरली जाणार नाही. काश्मिरी बांधवांना त्यांच्या शौर्यपूर्ण संघर्षात एकटे सोडणार नाही पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा असिफ म्हणाले, भारताने पाकिस्तान शहरात घुसून कारवाई केल्यास त्याची किमत भारताला मोजावी लागेल. जर पाकिस्तानी नागरीकांना काही इजा झाली, तर भारतीय नागरीक सुरक्षित राहणार नाहीत. पहलगाममध्ये निरपराध २८ हिंदू पर्यटकांच्या भीषण हत्याकांडानंतर भारताने गप्प बसून सहन करावे असे पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांना वाटते काय? पहलगाम हत्याकांडानंतर त्याच्याशी आमचा काही संबंध नाही, हल्ला करणारे स्वातंत्र्य सैनिक असू शकतात अशी प्रतिक्रिया पाकिस्तानने व्यक्त केली होती म्हणूनच अजमल कसाबसारखा दहशतवादी चेहरा जिवंत पुरावा म्हणून भारताला, जगाला पुन्हा एक्दा दाखवावा लागेल पहलगामची घटना म्हणजे पाकिस्तानकडून भारतावर हमाससारखा झालेला हल्ला आहे. आता भारत सरकार इस्रायलप्रमाणे सडेतोड उत्तर देणार, याची सारे जग वाट पाहत आहे. खरेतर पहलगाममध्ये हत्याकांड घडवून पाकिस्तानने भारताच्या विरोधात फार मोठा जुगार खेळला आहे.

टी.व्ही. स्टुडिओत बसून पाकिस्तानला नेस्तनाबूत करण्याची वल्गना करणारे अँकर आणि जनतेतील उन्मादी कोलाहल सरकारने आटोक्यात ठेवणे ही काळाची गरज आहे. युद्ध आणि मुत्सद्देगिरी हे गंभीर विषय टीआरपीसाठी वापरले जाऊ शकत नाहीत. देशातील व्हीआयपी आणि व्हीव्हीआयपी यांची संख्या जगात सर्वाधिक आहे. त्यांच्या सुरक्षेसाठी हजारो प्रशिक्षित सुरक्षा कर्मचारी गुंतले आहेत. त्याची खरच गरज आहे का? एकीकडे सैन्य संख्या रोडावत आहे, तेथे अग्निवीरसारखी कंत्राटी योजना राबविण्यात येते तर दुसरीकडे या तथाकथित अति महत्त्वाच्या व्यक्तींना संरक्षण देण्यासाठी प्रशिक्षित कमांडोजची नेमणूक करण्यात येते आणि काश्मीरमध्ये दोन हजार पर्यटक असलेल्या ठिकाणी एकही सुरक्षा कर्मचारी नसणे हे कितपत योग्य आहे याचा विचार केला पाहिजे.

भारताच्या सीमेवरील भौगोलिक व राजकीय परिस्थिती, प्रचंड मोठी सागरी सीमा लक्षात घेता अग्निवीर योजनेचा गांभीर्याने पुनर्विचार होणे गरजेचे आहे. सहा महिन्यांच्या प्रशिक्षणाच्या आधारे हे अग्निवीर सियाचिन, पूर्वोत्तर खडतर प्रदेश, पश्चिमेच्या वाळवंटात कसे टिकाव धरतील? चार वर्षांच्या सेवेनंतर ७५ अग्निवीर सेवानिवृत्त होणार याचे दडपण त्यांच्यावर नक्की असणार हासुद्धा महत्त्वाचा घटक आहे. नौदल आणि वायुसेनेतील अग्निवीरांसमोर तर तंत्रज्ञान आणि समुद्रावरील जीवनाशी जुळवून घेण्यासाठी किमान दीड ते दोन वर्षे जातील, हे नाकारता येत नाही. नुकतेच तातडीने सरकारने अत्यंत कडक निर्णय घेतले ते किती परिणामी ठरतात ते काळच ठरवेल. सरकारने बोलाविलेली सर्वपक्षीय बैठक हे स्वागतार्ह पाऊल होते परंतु या बैठकीत सहभागी होण्याऐवजी मा. पंतप्रधान बिहार दौऱ्यावर जाणे मात्र खटकणारे आहे. काश्मीर प्रश्न सोडविण्यासाठी कोणतीही जादूची छडी उपलब्ध नाही, तो केवळ मुत्सद्दीपणाने सुटू शकतो याबाबत तज्ज्ञाञ्ध्ये एकमत आहे. पाकिस्तान भारताच्या तुलनेत सर्व आघाड्यांवर खूप मागे आहे. जसे तो राजकीय अस्थिरता, लोकशाही मूल्यांचा ऱ्हास यामुळे प्रदीर्घ काळ ग्रासला आहे, तेथील अर्थव्यवस्था डबघाईस तर महागाई, बेरोजगारी आणि परकीय कर्जाचे ओझे हे विक्रमी पातळीवर पोहोचले आहे. दहशतवाद पोसल्याची किंमत त्यांना मोजावी लागत आहे. तर संयम, अराजकीय आणि धर्मनिरपेक्ष सैन्य, विकसनशील अर्थव्यवस्था आणि जगातील सर्वात मोठी लोकशाही ही आपली बलस्थाने आहेत. पुलवामा हल्ल्याला आज सहा वर्षे पूर्ण झाली आहेत त्याचप्रमाणे पहलगाम आत्मघाती हल्ल्याला सुध्दा आज आठ दिवस झाली आहेत. देशभरात या २८ पर्यटकांना श्रद्धांजली वाहिली जात आहे. आजच्या दिनी त्या सर्व पर्यटकांना भावपूर्ण श्रध्दांजली!

**प्रविण बागडे, नागपूर**

# महाराष्ट्र दिन विशेष लेख.. "कुठे नेऊन ठेवलाय आम्हीच आमचा महाराष्ट्र..?"

"बहू असोत सुंदर संपन्न की महा
प्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश हा..."

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी या गीतातून महाराष्ट्राच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेतला आहे. विदर्भ,कुंतल, अश्मक ,लाट अपरांत अशा विविध नावाने एकवटलेला देश म्हणजे महाराष्ट्र होय.१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली.संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या माध्यमातून अनेक जनतेच्या बलिदानानंतर आणि संघर्षानंतर हे राज्य निर्माण झाले हे काही नव्याने सांगायला नको.महाराष्ट्र हा केवळ भौगोलिक पुनर्रचना झालेला परिसर नाही होता तर मराठी भाषिकांच्या अस्मितेचा विजय होता.कालचा महाराष्ट्र म्हणजे संघर्षातून उभा राहिलेला आत्मसन्मानाचा महाराष्ट्र होता तर,आजचा महाराष्ट्र टेक्नॉलॉजीच्या दिशेने वाटचाल करणारा आत्मनिर्भर महाराष्ट्र आहे,ह्यात दुमत नाही.कालच्या महाराष्ट्रात जिथे शिवाजी महाराजांच्या काळापासून "एकत्र येऊन लढा" हा संदेश दिला गेला त्याच महाराष्ट्रात आज "जातीजातीत भेदाभेद करून, स्पर्धा करून पुढे जा" ही भावना जन्माला येत आहे.कालच्या महाराष्ट्राने आपल्याला संस्कार मूल्य आणि लढण्याची वृत्ती दिली आज त्याच महाराष्ट्राने नवनवीन संधी, ज्ञान, तंत्रज्ञान याबरोबरच जाती-जातीत भेदाभेद, भ्रष्टाचार, बेरोजगारी, महापुरुषांचे विचार अंगी करायचे सोडून पुतळे पाडणे, खालावलेलं राजकारण, हे सगळं देत आहे आणि आपली महाराष्ट्रीयन माणसं काय चूक काय बरोबर ह्याची शहानिशा न करता आत्मसात करताना दिसत आहे. आणि त्यावर उपाय म्हणून उपोषण, जातीय हल्ले , जाळपोळ, महाराष्ट्र बंद यासारखी फुकट शस्त्र निवडत असताना दिसत आहेत ही शोकांतिका आहे.ज्या महाराष्ट्रात चालुक्य, राष्ट्रकूट, सातवाहन, वाकाटक, देवगिरीचे यादव यांच्यासारख्या कितीतरी राजघराण्यांनी वैभवशाली सत्ता स्थापन केली आणि कर्तृत्व गाजवलं. त्याच महाराष्ट्रात मूठभर मावळ्यांसोबत 'हे राज्य व्हावे ही तो श्रींची इच्छा' असं म्हणत ज्यांनी हिंदवी स्वराज्याची मुहूर्तवेढ रोवली छत्रपती शिवाजी महाराजांनी आणि याच कमावलेल्या मराठी स्वाभिमानासाठी आणि मराठी अस्मितेला तडा जाऊ नये म्हणून ज्यांनी अगणित मरणयातना सहन करून बलिदान दिले अशा धर्मवीर संभाजी महाराजांचा हा महाराष्ट्र... आज मी माझं मत ज्यांच्यामुळे ठामपणे मांडू शकते, वाचू शकते, लिहू शकते ज्यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तवेढ फक्त महाराष्ट्रात रोवून पूर्ण भारतभर पसरवली ते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले हे दाम्पत्य देखील महाराष्ट्रातीलच आहे."सरकारचे डोके ठिकाणावर आहे का"... म्हणून ज्यांनी त्या बलाढ्य इंग्रजांनाच फटकारलं ते लोकमान्य टिळक हे देखील महाराष्ट्रातीलच...आणि ते संविधान संविधान असं काहीतरी ऐकलं असेल ना याची आठवण काही जणांना फक्त काही कायदेशीर कारवाई करायची असेल तेव्हाच येते ते संविधान ज्यांनी २ वर्ष ११महिने १८ दिवसात लिहून पूर्ण केले ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे देखील महाराष्ट्रातीलच...ही यादी खूप मोठी आहे... धर्म, कला ,तत्वज्ञान ,अध्यात्म, शौर्य, कर्तुत्व, धैर्य, अशा सगळ्याच क्षेत्रात रत्न घडवणाऱ्या रत्नकारांचा हा राष्ट्र म्हणजे महाराष्ट्र...आजचा महाराष्ट्र एक आधुनिक औद्योगिक आणि शिक्षित राज्य म्हणून ओळखला जातो, याचा फार अभिमान आहे. महाराष्ट्राची राजधानी असलेली मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी आहे तर पुणे हे शिक्षणाचे माहेरघर आणि सोबतच आय टी हब बनले आहे... स्मार्टसिटी, स्टार्टअप्स, कृषी तंत्रज्ञान, महिला सक्षमीकरण, शिक्षण संस्था, बँका अशा एक ना अनेक क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर आहे... एका बाजूला समृद्ध महाराष्ट्र व औद्योगिकरण यासारखी यशस्वी चित्र दिसून येत असताना अभिमानाने उर भरून येतो तर दुसऱ्या बाजूला पाणीटंचाई,दुष्काळ,शेतकरी आत्महत्या, रोजगार-निर्मिती, कुपोषण, दिवसेंदिवस खालावत चाललेली राजकारणाची दशा, न्यायासाठी तोंड वासून उभे असलेले निर्दोष सोमनाथ सूर्यवंशी, संतोष देशमुख यासारखी प्रकरणे, अशा एक ना अनेक समस्यांना प्रभावीपणे तोंड देण्यात कमी पडत असल्याचे जाणवते.खऱ्या अर्थाने जिथे महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना प्रगतीच्या मार्गावर कसे नेता येईल याकडे लक्ष देण्याचे सोडून केवळ शहरांची नामांतरे केली जात आहेत ही शोकांतिका आहे...काही वर्षांपूर्वी जे म्हणत मोठमोठ्या आवाजात म्हणत होते "कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा" तेच आज प्रामाणिकपणे कबूल करतील का "कुठे नेऊन ठेवलाय आम्हीच आमचा महाराष्ट्र..?"दरवर्षी प्रमाणे ह्यावर्षी ही महाराष्ट्रदिनी महाराष्ट्राचे तोंड भरून कौतुक केली जाईल, पण पुढील दिवशीच्या सकाळचं काय? कुठल्यातरी वृत्तवाहिनीवर, वर्तमानपत्रात आजचा महाराष्ट्र दिन शासनाने कसा चुकीचा वा बरोबर साजरा केला याचाच पाढा लिहिला जाईल आणि त्याच्यावर तिसरा कोणी प्रतिक्रिया देणार, त्यावर चौथा त्या बातमीला बघून न बघितल्यासारखे करणार... असो १ मे ही तारीख केवळ एक सार्वजनिक सुट्टी म्हणून एन्जॉय न करता तो आपल्या संस्कृतीचा, इतिहासाचा आणि भविष्याचा गौरव करण्याचा दिवस आहे, हे विसरता कामा नये... चला आपण सर्वांनी मिळून महाराष्ट्राला एक प्रगत समतोल आणि समृद्ध राज्य बनवण्यासाठी योगदान देऊया...जय महाराष्ट्र...

**लेखन**
**काजल आठवले**
**कल्याण (मुंबई)**